**भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे विशेष इलेक्ट्रॉनिक निधि अंतरण योजना**
**मार्च ३१, २००३**

भारतीय रिझर्व्ह बँकेने इतर बँकांच्या सहकार्याने विशेष इलेक्ट्रॉनिक निधि अंतरण योजना (एस ई एफ टी) सुरु केली आहे. या योजने मुळे विधि अंतरण सुरक्षित व जलदपणे तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातून बँकांच्या देशातील बऱ्याच शाखांमधे होऊ शकेल. ही योजना एप्रिल १, २००३ पासून कार्यान्वित होईल व आंतर बँक निधि अंतरणाचे हिशेब मुंबईत पूर्ण केले जातील.

योजनेची मुख्य लक्षणे

- योजनेत भाग घेणाऱ्या शाखांतील खात्यांमधून आंतरबँक निधि अंतरण त्याच दिवशी होण्याची सोय.
- ही योजना बँकांच्या संगणकाने जोडलेल्या शाखांसाठी आहे. त्यामुळे एस ई एफ टी संदेश इलेक्ट्रॉनिक पद्धतिने व जलद पाठवले जातील.
- या योजनेखालील आंतर बँक अंतरणाचे हिशेब मुंबईत केले जातील व ही प्रक्रिया राष्ट्रीय समाशोधन कक्ष, भारतीय रिझर्व्ह बँक, नरीमन पॉईंट, मुंबई येथे होईल.
- आठवड्यातील कामाच्या दिवशी रोज तीन हिशेब चक्रे (१२.०० मध्यान्ह, २.०० दुपार व ४.०० दुपार) होतील व शनिवारी दोन हिशेबचक्रे (१२.०० मध्यान्ह व २.०० दुपार) होतील.
- आवक एस ई एफ टी अंतरणाची जमा लाभार्थीच्या खात्यावर पुढच्या हिशेबचक्रापूर्वी केली जाईल.
- ज्या आलेल्या रकमा लाभार्थीच्या खात्यावर जमा करणे शक्य नसेल, त्या पुढच्या हिशेबचक्रात परत केल्या जातील, अन्यथा त्या लाभार्थीच्या खात्यावर जमा केल्याचे गृहित धरले जाईल.
- एस ई एफ टी योजने मधील हिशेब चक्र आताच्या ई एफ टी योजने पासून वेगळे असेल एस ई एफ टी योजना कार्यान्वित झाल्यावर ही चालू राहील.
- एस ई एफ टी योजनेत सुमारे ५०० शहरांतील २५०० बँक — शाखा सामील होतील.

ही योजना भांडवल बाजारातील प्रस्तावित टी + २ खालील फिरत्या हिशेबातील रकमांचे आदान प्रदान वेळेवर करण्यास साहाय्य करील. या योजनेतील शाखांच्या यादीसर अधिक माहितीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळास भेट द्या. (www.rbi.org.in)

**अल्पना किल्लावाला**
**मुख्य व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज २००२-०३ / १०१८**